|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

( पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव )

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**जा.क्र.कबचौउमवि/७-अ/३०३८/२०२०** **दिनांक: ०५/११/२०२०**

प्रति,

**१) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक.**

**२) कबचौउमविंतर्गत सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि विभागांचे मा.विभागप्रमुख**

विषय : उन्हाळी २०२० मधील ऑक्टोबर-२०२० मध्ये घेण्यात येत असलेल्या अंतिम वर्ष/ अंतिम सत्र बॅकलॉगसह MCQ based ऑनलाईन/ ऑफलाईन परीक्षेपासून विविध कारणाने वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे वेळापत्रक........

संदर्भ : विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/७-अ/२९५०/२०२०, दिनांक २६.१०.२०२०.

महोदय,

अंतिम वर्षातील नियमित, अनुशेषित व रिपीटर्स विद्यार्थ्यांची परीक्षा दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० पासून घेण्यात आली. तथापि, सदर परीक्षेसाठी अर्ज सादर करुनही जे विद्यार्थी काही अपरिहार्य कारणांमुळे सदर परीक्षेपासून वंचित राहिले आहेत, अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी ***दिनांक १८.११.२०२० ते २३.११.२०२० या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत, एम.सी.क्यू. पॅटर्ननुसार फक्त ऑनलाईन पध्दतीने*** खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे परीक्षा आयोजीत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | परीक्षेचा कालावधी | रकाना क्र.०३ मध्ये नमूद वेळापत्रकानुसार त्या-त्या विषयांची परीक्षा देण्याचा कालावधी | परीक्षा फक्त Online पध्दतीने होणार आहे. |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ०१ | सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम **(वंचित विद्यार्थ्यांसाठी)** | दिनांक १२.१०.२०२० ते २०.१०.२०२० या कालावधीतील वेळापत्रकातील सर्व विषय | १८.११.२०२०<br>१९.११.२०२०<br>२०.११.२०२० | **वंचित विद्यार्थ्यांनी रकाना क्र.०४ मध्ये नमूद केलेल्या तीन तारखांच्या दरम्यान त्याच्याशी संबंधित असलेल्या विषयाची परीक्षा द्यावी.** |
| ०२ | सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम **(वंचित विद्यार्थ्यांसाठी)** | दिनांक २४.१०.२०२० ते १२.११.२०२० या कालावधीतील वेळापत्रकातील सर्व विषय | २१.११.२०२०<br>२२.११.२०२०<br>२३.११.२०२० | |

उन्हाळी २०२० मधील स्थगीत, तथापि, ऑक्टोबर-२०२० मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत, अर्ज सादर करुनही जे विद्यार्थी अपरिहार्य कारणांमुळे सदर परीक्षेपासून वंचित राहिले आहेत, अशा विद्यार्थ्यांसाठी एक संधी उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने उपरोक्त परीक्षा आयोजीत करण्यात आली असून, सदरच्या परीक्षेनंतर कुठल्याही परिस्थितीत परीक्षांचे पुन:श्च आयोजन करण्यात येणार नाही व या परीक्षेत विद्यार्थी वंचित राहिल्यास ते स्वत: जबाबदार राहतील. **यापूर्वी परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांना या परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही.**

तरी उपरोक्त बाब **वंचित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी** तसेच अशा विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालय/ परिसंस्था तसेच विद्यापीठ प्रशाळा/ विभागातील ***'ऑनलाईन परीक्षा समन्वयक'*** यांचेशी संपर्क साधून ऑनलाईन परीक्षेबाबत माहिती जाणून घ्यावी व नमूद कालावधीमध्ये ऑनलाईन परीक्षेस प्रविष्ठ व्हावे. ऑनलाईन परीक्षाबाबतची माहिती व समन्वयकांची यादी विद्यापीठाच्या http://nmu.ac.in/ examination.aspx या लिंकवर उपलब्ध आहे.

**(भ. प्र. पाटील)**
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ